ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली

दिनांक :– १५.०४.२०२५

## प्रेस नोट

**आरोपी लोकसेवक मोहन गणपत जाधव, ग्रामसेवक, मौजे —आडोळ, ता.सेनगाव, जि.हिंगोली, यांनी तक्रारदार यांचेकडे ५,०००/—रू. लाचेची मागणी करून, दिनांक १५.०४.२०२५ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान ५,०००/— लाचेची रक्कम स्विकारल्याने त्याचे विरूध्द पोस्टे सेनगाव, जि.हिंगोली येथे गुन्हा दाखल केला आहे.**

---

यातील तक्रारदार हे ग्रामपंचायत आडोळचे सदस्य असून, त्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सन २०१९—२० अंतर्गत अहिल्याबाई होळकर सिंचन योजनेतून विहीर मंजुर झाली होती. या विहीर बांधकाम करीता तक्रारदार यांना सदर योजने अंतर्गत २ लाख ९९ हजार रूपये मंजूर झाले होते. त्याप्रमाणे विहिरीचे काम पुर्ण केलेले असून आजपर्यंत तक्रारदार यांना २,०१,९२४/—रू.रक्कम अदा करण्यात आले आहे. त्याचे कुशलचे बिल (शेवटचा हप्ता) येणे बाकी आहे. तसेच त्याचे यांचा चुलत काका यांचे जनावराच्या गोठ्याचे शेडचे काम पुर्ण झाले असून, त्यांचे देखील सदर योजने अंतर्गत यांनी ला.प्र.वि.हिंगोली येथे तक्रार दिली होती की, तक्रारदार यांचे कुशलचे बिल (शेवटचा हप्ता) येणे बाकी आहे तसेच तक्रारदार यांचे दुसरे चुलत काका यांचे यापुर्वी ग्रामसेवक जाधव यांचेकडे दाखल केलेल्या घरकुलाच्या प्रस्तावावर ग्रामसेवक यांची सही करून घरकुलाचा प्रस्ताव पंचायत समिती सेनगाव येथे पाठविणे बाकी होते. त्याअनुषंगाने तक्रारदार हे त्यांचे कुशलचे बिलावर व त्यांचे चुलत काका यांचे कुशलचे बिलावर तसेच त्यांचे दुसरे चुलत काका यांचे घरकुलच्या प्रस्तावावर सही करून घरकुलाचा प्रस्ताव पंचायत समिती सेनगाव येथे पाठविणे असल्याने दिनांक ०२.०४.२०२५ रोजी लोकसेवक जाधव ग्रामसेवक यांना भेटुन नमुद कुशलचे बिलावरव घरकुलाचे प्रस्तावावर सही करण्यासाठी विनंती केली तेव्हा लोकसेवक जाधव हे तक्रारदार यांना म्हणाले की तुम्ही तुमचे व तुमचे काकाचे कुशल बिलाचे प्रत्येकी ३,०००/— रूपये व तक्रारदाराच्या दुसऱ्या काकाच्या घरकुलाच्या प्रस्तावाचे २,०००/— रूपये असे एकुण ८,०००/— रू मला आणुन द्या तरच मी तुमचे व तुमच्या काकाच्या कुशलच्या बिलावर व तुमच्या दुसऱ्या चुलत काकाच्या घरकुलाच्या प्रस्तावावर सह्या करतो असे म्हणुन मला ८,०००/— रू. लाचेची मागणी केल्याची तक्रार दि.०२.०४.२०२५ रोजी प्राप्त झाली होती.

दि.०२.०४.२०२५ रोजी तक्रादार यांचे तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी केली असता लोकसेवक जाधव, ग्रामसेवक यांनी तक्रारदार यांना त्यांचे व त्यांचे चुलत काका यांचे कुशल बिलावर सही करण्यासाठी प्रत्येकी ३,०००/—रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती दोघात ३,०००/—रू. लाचेची मागणी केली. तसेच तक्रारदार यांचे दुसरे चुलत काका यांचे घरकुल प्रस्तावावर सही करून सदरचे प्रस्ताव पंचायत समिती सेनगाव येथे पाठविण्याकरीता २,०००/—रू. लाचेची मागणी केली असे एकुण ५,०००/— रू लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दिल्याचे निष्पन्न झाले,

त्यावरून दि. १५.०४.२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्याण तक्रारदार हे लाचेची रक्कम घेवून लोकसेवक जाधव, ग्रामसेवक, यांना देण्यासाठी त्यांचे सेनगाव येथील खाजगी रूमवर गेले, तेव्हा तक्रारदार त्यांचेसोबत कामासंबंधाने बोलणी केली असता, लोकसेवक जाधव हे तक्रारदार यांना "पेमंट आणलं का" असे म्हणून लाचेची रक्कम रूममधील फरताळावर ठेवण्यास सांगून, सदर लाचेची रक्कमी ५,०००/— रू. पंचासमक्ष स्विकारले. त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

त्यावरून मोहन गणपत जाधव ,वय ५७ वर्ष, व्यवसाय नौकरी— ग्रामसेवक, मौजे —आडोळ, ता.सेनगाव, जि.हिंगोली, रा. हिरडव रोड, कन्हैया नगर, लोणार, ता.लोणार,जि.बुलढाणा. यांचे विरूध्द पोलीस स्टेशन सेगनगाव जि. हिंगोली येथे गुरन १४०/२५, कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कामगिरी श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, डॉ. संजय तुंगार, अपर पोलीस अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, श्री विकास घनवट, पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली, श्री.प्रफुल्ल अंकुशकर, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांनी, पोहेकॉ श्री राजाराम फुपाटे, रवि वरणे, गोंविद शिंदे, भगवान मंडलीक, चापोना श्री शेख अकबर अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**श्री. संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मो.नं. ९२२६४८४६९९**
**श्री. विकास घनवट, पोलीस उप अधीक्षक, मो.नं.९३५९१२८८८९**
**टोल फ्री क.—१०६४, दुरध्वनी क.०२४५६—२२३०५५**

15/04

**विकास घनवट**
**पोलीस उप अधिक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली.**